# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (परिवहन विभाग)

दि. ०६/०१/२०२०

## प्रेस नोट

**"आपली बस'' अंतर्गत बस ऑपरेटर्स कडून योग्य प्रकारे रखरखाव नसलेल्या बसेस वर दंडात्मक कार्यवाही करून नियमाप्रमाणे शुल्क वसुली करावी.**

**-मा. श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, सभापती, परिवहन समिती, मनपा, नागपूर.**

नागपूर शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाची शहर बस सेवा उपलब्ध व्हावी या हेतुने परिवहन समिती कटीबध्द आहे, तथापी असे निदर्शनास आलेले आहे की, आपली बस अंतर्गत बहुतांश बसेस चे रखरखाव हे बस ऑपरेटर कडून व्यवस्थित केल्या जात नसल्यामुळे, मा. सभापती, परिवहन समिती, मनपा नागपूर यांनी दि. ०२/०१/२०२० रोजी दिलेल्या निर्देशानुसार, परिवहन विभागील अधिकारी व कर्मचारी यांचे ०३ गट तयार करून प्रत्येकी गट निहाय शहर बस आगारांना अनुक्रमे ऑरेंज स्ट्रिट डेपो, पटवर्धन डेपो व खापरी डेपा येथे पहाटे ०५:०० वा. परिवहन सभापती यांचे मार्गदर्शनात दि. ०३/०१/२०२० रोजी मा. सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेशान्वये यांचे समवेत स्वत: हजर राहुन कार्यरत सर्व बसेसची आकस्मितपणे पडताळणी केली असता डेपो निहाय नादुरूस्त बसेस बाबतचा तक्ता विविध मुद्यांवर स्तंभानुसार तयार करण्यात आलेला असून खालील प्रमाणे आढळल्यात.

### ऑरेंज स्ट्रीट (हिंगणा) डेपो

मा. सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेशान्वये व त्यांचे उपस्थितीत गट "अ'' तपासणी पथकाचे प्रमुख श्री. पागे (प्रशासकीय अधिकारी)व श्री. मिश्रा (उप-अभियंता) यांचे मार्गदर्शनानुसार गिरीष महाजन, मुकेश गौरे, गौरव मेश्राम,यांनी ऑरेंज स्ट्रीट येथील मे. हंसा सिटी बस डेपो यांचेद्वारे संचालित शहर बस सेवेच्या ११५ बसेस प्रत्यक्षात तपासण्यात आल्यात. त्यामध्ये खालील त्रुटया आढळून आल्यात.

| Sr. No. | K.P.I.T. | Glass | Bus Clean | Floor Damage | Horn | Door | Seats | Camera | Fire Cylender | Dislay | First Aid Box | Bonet Area | Uniform | Head Light | Break Light | Inner Light | Black Smoke | Mobile D/C | Wiper |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | 04 | 03 | All | 10 | All Clear | 37 | 12 | 15 | All | 30 | All Available | 06 | 10/05 | All Clear | 47 | All Clear | 09 | 22/09 | 05 |

सोबततच्या तक्त्यानुसार बसनिहाय आढलेल्या त्रुटया त्यांचे समोर दर्शविलेल्या आहेत. एकूण ११५ बसेसची तपासणी केली असता ०३ बसेस मध्ये मोठया स्वरूपाच्या तांत्रिक त्रुटया आढळल्यामुळे मार्गस्थ न करता डेपोला दुरूस्ती साठी परत पाठविण्यात आल्यात व उर्वरीत ११२ बसेस सकाळी १०:०० मार्गस्त करण्यात आल्यात.

## पटवर्धन डेपोचा अहवाल

मा. सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेशान्वये त्यांचे उपस्थितीत गट "ब" तपासणी पथकाचे प्रमुख श्री. पिपरूडे (श्रम अधिकारी)व श्री. लुंगे (यांत्रिकी अभियंता) यांचे मार्गदर्शनानुसार सुनिल शुक्ला, रितेश पिंपरे, अरूण मेंढे, ओमकार डकाह, गणेश पिल्ले, योगशे समुद्रे यांनी पटवर्धन येथील मे. आर. के. सिटी बस डेपो यांचेद्वारे संचालित शहर बस सेवेच्या ११६ बसेस प्रत्यक्षात तपासण्यात आल्यात. त्यामध्ये खालील त्रुटया आढळून आल्यात.

| Sr. No. | Bus No. | Glass | Bus Clean | Floor Damage | Horn | Door | Seats | Camera | Fire Cylender | Display | First Aid Box | Bonet Area | Uniform | Head Light | Break Light | Inner Light | Black Smoke | Mobile D/C | Wiper |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | 07 | 72 | 46 | 01 | 63 | 56 | 32 | 66 | 77 | 109 | 21 | 09/05 | 02 | 21 | 01 | 06 | 3/1 | 06 |

सोबततच्या तक्त्यानुसार बस निहाय आढळलेल्या त्रुटया त्यांचे समोर दर्शविलेल्या आहेत. एकूण ११६ बसेसची तपासणी केली असता ०९ बसेस मध्ये मोठया स्वरूपाच्या तांत्रिक त्रुटया आढळल्यामुळे मार्गस्थ न करता डेपोला परत पाठविण्यात आल्यात. व उर्वरीत सकाळी १०:०० पर्यंत १०७ बसेस मार्गस्थ करण्यात आल्यात.

## खापरी डेपोचा अहवाल

मा. सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेशान्वये व त्यांचे उपस्थितीत गट "ब" तपासणी पथकाचे प्रमुख श्री. सोनटक्के (वाहतुक व्यवस्थापक) व श्री. भारद्वाज (लेखा अधिकारी) यांचे मार्गदर्शनानुसार समिर परमार, रामराव मातकर, अश्विन पाचपौर, रोहन महाजन, यांनी खापरीयेथील मे. ट्रॅव्हल टाईम्स बस डेपो यांचेद्वारे संचालित शहर बस सेवेच्या ९५ बसेस प्रत्यक्षात तपासण्यात आल्यात. त्यामध्ये खालील त्रुटया आढळून आल्यात.

| Sr. No. | Bus No. | Glass | Bus Clean | Floor Damage | Horn | Door | Seats | Camera | Fire Cylender | Display | First Aid Box | Bonet Area | Uniform D/C | Head Light | Break Light | Inner Light | Black Smoke | Mobile D/C | Damage |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | 07 | 76 | 13 | All Clear | 52 | 44 | 07 | 10 | 31 | 76 | 05 | 10/09 | 03 | 17 | All Clear | 28 | 30/13 | 15 |

सोबततच्या तक्त्यानुसार बस निहाय आढलेल्या त्रृटया त्यांचे समोर दर्शीविलेल्या आहेत. एकूण ७८ बसेसची तपासणी केली असता ०१ बस मध्ये महत्वाच्या तांत्रिक त्रुटया आढळल्यामुळे परत केली व सकाळी १०:०० पर्यंत बाकी बसेस मार्गस्त करण्यात आल्यात.

दि. ०३/०१/२०२० रोजी मा. सभापती, परिवहन समिती, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आदेशान्वये विभागाच्या वतीने आकस्मिकरित्या तपासणी नंतर आढळलेल्या त्रुटयाच्या अनुषंगाने संबधीत डेपोनिहाय तिनही ऑपरेटर्सवर करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार दंड आकारण्याची कार्यवाही मे. डिम्टस् यांचे मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. शहर बस ऑपरेटरच्या आर.एफ.पी. नुसार यापुर्वी जेव्हा निविदा व करार तयार करण्यात आले होते तेव्हा डेपो खडीकरण व अद्यावत मुलभुत सुविधा ऑपरेटर करीता उपलब्ध नव्हते, त्यामुळे कुठल्याही प्रकारची दंडाची तरतुद सहा महिन्याकरीता शिथील करण्यात आलेली होती. परंतु सहा महिने त्यापुढील कालावधी उलटुन सुध्दा दंडाची कार्यवाही मे. डिम्टस् यांचे मार्फत करण्यात आलेली नसुन ती आता तातडीने करणे गरजेचे आहे. याबाबत मे. डिम्टस् यांचे मार्फत जर वरील कार्यवाही करीता विलंब करत असल्यास त्याचे वर सुध्दा दंडाची कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. स्वत: सभापती महोदयांनी धुळीयुक्त बसेसमध्ये आसन चे परिक्षण करून खेद व्यक्त केला.

तरी डेपोनिहाय बसेसच्या झालेल्या पडताळणीनुसार आढळुन आलेल्या त्रुटी अन्वये तसेच आर. एफ.पी. नुसार आतापावेतो दंड न आकारण्यात आल्यामूळे खालीलप्रमाणे अंदाजित दंड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात बाबत मा. सभापती यांनी विभागाला निर्देश दिलेले आहेत.

१) ऑरेंज स्ट्रिट डेपो - रू. ५,००,०००/- दंड

२) पटवर्धन डेपो - रू. ५,००,०००/- दंड

३) खापरी डेपो - रू. ५,००,०००/- दंड, असे एकूण रू. १५ लक्ष एवढा दंड आकारण्याचे सुचित केले.

तसेच आर.एफ.पी. नुसार तरतुद असून सुध्दा गेल्या अनेक वर्षापासुन याबाबत बस ऑपरेटर यांचेवर दंड न आकारल्याबाबत मे. डिम्टस् यांचे वर रू. २,००,०००/- एवढा अंदाजित दंड आकारण्याचे सुध्दा निर्देश देण्यात आले. यापुढे सुध्दा मे. डिम्टस् यांनी दररोज डेपोनिहाय बसेसची तपासणी (दैनंदिन साप्ताहिक व मासिक) करण्याकरीता पर्यवेक्षक संख्या वाढवुन नियमित स्वरूपात दंडाची कार्यवाही करावी.

प्रशासकीय अधिकारी,
परिवहन विभाग